भारत India Forum

**Bharat India Forum**

1st Floor, Shivaratna Complex, Opposite DAV Public School Ambedkar Chowk, Aundh, Pune, Maharashtra- 411007

bharatindiaforum@gmail.com YouTube

दिनांक: ३ मार्च, २०१९

प्रति,
मा. देवेंद्र फडणवीस,
मुख्यमंत्री,
महाराष्ट्र राज्य.

**विषय - हरभरा आधारभाव अंमलबजावणी, निर्यात प्रोत्साहन**

महाराष्ट्रात हरभरा आवक सुरू झाली असून, मार्केट आधारभावाच्या (४६२० रु. प्र. क्विं) खाली ट्रेड होत आहे. मिडिया रिपोर्टनुसार 'नाफेड'कडे अजूनही सुमारे १९ लाख टन हरभरा शिल्लक आहे. साधारणपणे देशाची दोन-अडीच महिन्यांची गरज भागेल इतका जूना माल शिल्लक आहे. आजघडीला जून एनसीडीईएक्स वायदा ४१४० रु. प्र. क्विं. ला ट्रेड होत असून, त्यातही मंदीचा कल दिसतोय.

२८ फेब्रुवारीला जारी सरकारी अनुमानानुसार देशात १०३ लाख टन हरभऱ्याचे उत्पादन अपेक्षित आहे. जूना शिल्लक १९ लाख टन मिळून १२२ लाख टनाचा पुरवठा चालू वर्षी (२०१९-२० ) असेल. देशाच्या एकूण गरजेच्या तुलनेत आठ-दहा टक्के पुरवठा जास्तीचा दिसतोय. यामुळे बाजार दबावात आहे. या पार्श्वभूमीवर, नाफेडने शिल्लक मालाची विक्री थांबवणे, राज्याने आधारभावाने खरेदी सुरू ठेवणे, केंद्राने निर्यात प्रोत्साहन देणे हेच पर्याय आहेत.

कृपया, शेतकरी हितार्थ वरीलप्रमाणे योग्य कार्यवाही व्हावी, ही नम्र विनंती.

कळावे,
विनय हर्डीकर
निलेश शेजवळ
डॉ. दिनेश भोसले
दीपक चव्हाण
योगेश थोरात
डॉ. नरेश शेजवळ
डॉ. अंकुश चोरमुले
अभिजित कुपटे
डॉ. सुभाष आठल्ये
राजीव बसर्गेकर

(सदस्य, भारत इंडिया फोरम पुणे)